**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी**
**राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे – ४११ ००७**
www.yashada.org/admin@yashada.org

---

# <u>प्रतिनियुक्ती</u>

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासह प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अनुषंगाने सहायक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक व स्थावर व्यवस्थापक या पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

सहायक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक यांची पदसंख्या तीन असून त्यासाठी आवश्यक अर्हता महाराष्ट्र राज्य शासन सेवेतील वर्ग-१ मधील सेवेचा किमान पाच वर्षाचा अनुभव असणारे अधिकारी अशी राहील. स्थावर व्यवस्थापक याचे एक पद असून त्यासाठी आवश्यक अर्हता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, म्हाडा, सिडको यासारख्या व शासनाच्या इतर स्वायत्त संस्थेतील किमान पाच वर्षाचा अनुभव असणारे अभियंता अशी राहील.

इच्छुक व पात्र अधिकारी-उमेदवारांनी वरील पदासाठी अर्ज करताना अर्जासोबत त्यांची वैयक्तिक माहिती, संपूर्ण शासन सेवेचा तपशील, सध्याचे वेतनबँड व ग्रेड वेतन व अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडावे. अर्ज पाठविण्यासाठीची अंतिम मुदत २६ सप्टेंबर २०१९ असून ई-मेल पत्ता admin@yashada.org यावर अर्ज व माहिती पाठवावी.

सही/-
निबंधक
यशदा, पुणे